राष्ट्रीय कृषि विकास योजनेअंतर्गत शासकीय रोपवाटिकांचे बळकटीकरण योजनेस सन २०१७-२०१८ साठी प्रशासकीय व वित्तीय मान्यता.

महाराष्ट्र शासन
कृषि, पशुसंवर्धन,दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग,
शासन निर्णय क्रमांक :- फरोवा-२०१७/प्र.क्र.१४०/१३-अे,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,
दिनांक :- २७ नोव्हेंबर,२०१७

<u>संदर्भ</u> :- १) शासन निर्णय क्र. राकृवि-०३१७/प्र.क्र.२३/राकृवियो कक्ष, दि. ३/७/२०१७.
२) कृषि आयुक्तालयाचे पत्र क्र.फलो-२न/शारोवा/राकृवियो/१९२१/१७ दि.९/८/२०१७.

<u>प्रस्तावना</u>:-

राज्यात फळांच्या उत्कृष्ट बागा स्थापन करण्यासाठी १३६ शासकीय रोपवाटिका कार्यरत आहेत. सदर फळरोपवाटिकांखाली एकूण २१३२.८९ हे. क्षेत्रापैकी ८०९.७० हे.क्षेत्रावर नवीन व सुधारित जातीच्या विविध फळझाडांच्या मातृवृक्षांची लागवड केलेली आहे. या फळरोपवाटिकांवर जातीवंत व गुणवान कलमा /रोपांची निर्मिती केली जाते.याकरिता विविध जातीवंत मातृवृक्ष लागवड व जतन करण्यात येतात.सदर कलमा/रोपांचे गुणवत्ता नियंत्रणासाठी राज्यातील विभागीय समितीमार्फत रोगमुक्त कलमांची तपासणी केली जाते. या योजनेअंतर्गत फलोत्पादन विकास कामासाठी राज्यात चालू असलेल्या विविध योजनांशी निगडीत फळबाग लागवड कार्यक्रमासाठी शेतकऱ्यांना फळझाडांची जातीवंत व गुणवान कलमे/रोपे शासनमान्य दराने उपलब्ध करुन दिली जातात.

शासकीय रोपवाटिकांचे बळकटीकरण योजनेअंतर्गत साहित्य, सामुग्री पुरवठा,गौण बांधकामे व मजुरी या बाबीकरिता प्रामुख्याने अर्थसहाय्य दिले जाते. सदर योजनेअंतर्गत रोपवाटिकेवर पायाभूत सूविधा उभारणे आवश्यक असलेल्या मातृवक्षांची लागवड करणे, रोपवाटिकांच्या संरक्षणासाठी सिमाभिंत बांधणे, पाण्याची सुविधा उपलब्ध करुन घेणे. पॉलीहाऊस, शेडनेट,हार्डनिंग शेड, ग्रीन हाऊस, इ. सुविधा तयार करण्यासाठी निधी दिला जातो. सदर योजने अंतर्गत कलमा /रोपांचे उत्पादनासाठी अनुदान वेळेत उपलब्ध होणे अत्यावश्यक आहे.

शासन निर्णय क्र. राकृवि-०३१७/प्र.क्र.२३/राकृवियो कक्ष, दि.३/७/२०१७ च्या अन्वये राष्ट्रीय कृषि विकास योजनेंतर्गत शासकीय रोपवाटिकांचे बळकटीकरण या योजनेसाठी गौण बाधकामे रु. ३०४.४७ लाख, मातृवृक्ष लागवड रु.१४२.४७ लाख, सामुग्री पुरवठा-रु.८३.७६ लाख व आकस्मिक निधी रु. ५.३० लाख असा एकूण रु.५३६.०० लाख निधी मंजूर झालेला आहे. शासकीय रोपवाटिकांचे बळकटीकरण योजनेअंतर्गत खर्चाचासाठी रु.५३६.०० लाख निधीस प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय -

राष्ट्रीय कृषि विकास योजनेंतर्गत शासकीय रोपवाटिकांचे बळकटीकरण या योजनेसाठी शासन निर्णय क्र. राकृवि-०३१७/प्र.क्र.२३/राकृवियो कक्ष, दि.३/७/२०१७ च्या अन्वये गौण बाधकामे रु. ३०४.४७ लाख, मातृवृक्ष लागवड रु.१४२.४७ लाख, सामुग्री पुरवठा-रु.८३.७६ लाख व आकस्मिक निधी रु. ५.३० लाख अशा एकूण रु.५३६.०० लाख मंजूर निधीस शासकीय रोपवाटिकांचे बळकटीकरण योजनेअंतर्गत खर्चासाठी प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक २०१७११२७१२५२४६९३०१ असा आहे. हा आदेश डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Kamlakar Yeshvant Vanjare

Digitally signed by Kamlakar Yeshvant Vanjare
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=AGRICULTURE AND ADF DEPT, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=c08eef62183520696d2005b153b8cc2a552337a23fc4d457a4434216d9324c3b, serialNumber=6fd0ddfb9412fda09432e5f8a3e140c065770ba4ca63ef6fc5ba354810e2828b, cn=Kamlakar Yeshvant Vanjare
Date: 2017.11.27 12:55:44 +05'30'

(क.य.वंजारे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. आयुक्त कृषी, महाराष्ट्र राज्य,पुणे.
२. संचालक फलोत्पादन, कृषी आयुक्तालय,महाराष्ट्र राज्य,पुणे,
३. सर्व संचालक, कृषी आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य,पुणे,
४. सर्व विभागीय कृषी सहसंचालक,
५. सर्व जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी,
६. महालेखापाल-१/२, (लेखा व अनुज्ञेयता) मुंबई /नागपूर,
७. महालेखापाल-१/२ , (लेखा परीक्षा) मुंबई /नागपूर,
८. वरिष्ठ जिल्हा कोषागार अधिकारी,पुणे.
९. संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई
१०.सहसंचालक लेखा व कोषागारे, संगणक कक्ष, नवीन प्रशासन भवन, ५ वा मजला, मुंबई -३२,
११.अवर सचिव (रा.कृ.वि.यो)कृषि व पदुम विभाग, मंत्रालय,मुंबई.
१२.अवर सचिव, कार्या-१४८१, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
१३.कक्ष अधिकारी (अर्थसंकल्प), कृषि व पदुम (कृषि व फलोत्पादन) विभाग, मंत्रालय,मुंबई.
१४.निवड नस्ती (१३-अे)